# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र. १७/२०२१

**विषय :— अंतिम वर्षाच्या परीक्षा व निकाल जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आवारातील वसतिगृह खोलीचा ताबा सुपूर्त करणेबाबत...**

**संदर्भ :— वसतिगृह कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२५/२०२० दिनांक — ०६/०८/२०२०**
**१) वसतिगृह नोटीस दिनांक २५/०९/२०२०**
**२) वसतिगृह नोटीस दिनांक २३/११/२०२०**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारातील वसतिगृहामध्ये २०१९—२० या शैक्षणिक वर्षात राहात असणाऱ्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपुष्टात आलेल्या आहेत तसेच निकालही जाहीर झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, आपण राहात असलेल्या वसतिगृह खोलीचा ताबा दिनांक २७ जानेवारी, २०२१ पर्यत वसतिगृह कार्यालयाकडे सुपूर्त करण्यात यावा, जेणेकरून शैक्षणिक वर्ष २०२१—२२ वसतिगृह प्रवेशाचे नियोजन करणे सोयीचे होईल.

वसतिगृह कार्यालयाकडून वसतिगृह खोलीतील साहित्य घेवून जाण्यासाठी विद्यार्थ्यांना वेळोवेळी वरील संदर्भीय परिपत्रकाद्वारे व सूचनापत्रकाद्वारे सूचित केलेले आहे. बरेचशे विद्यार्थी वसतिगृह खोलीमधील स्वत:चे साहित्य घेवून गेलेले आहेत तसेच थोडया प्रमाणात विद्यार्थ्यांचे साहित्य नेणे अद्याप बाकी आहे. सदरील विद्यार्थ्यांना वसतिगृह खोलीतील साहित्य घेवून जाण्यासाठी परिपत्रक क्रमांक २२५/२०२० प्रमाणे प्रकिया पुर्ण करणे अनिवार्य आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

जे विद्यार्थी वर नमूद केलेल्या दिनांकापर्यत सदरील वसतिगृह खोलीचा ताबा वसतिगृह कार्यालयाकडे सुपूर्त करणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे वसतिगृह खोलीमधील साहित्य पंचनामा करून वसतिगृह कार्यालय व सुरक्षा विभाग यांच्या संयुक्त देखरेखीखाली वसतिगृह सामान कक्षात ठेवण्यात येईल. सामान कक्षात ठेवलेल्या साहित्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची असेल, याची कृपया नोंद घ्यावी.

**मुख्य वसतिगृह प्रमुख**

मुख्य वसतिगृह प्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११००७.

**गणेशखिंड, पुणे — ४११ ००७**
**सा.फु.पु.वि/वसतिगृह/२०२१—२२/८३६**
**दिनांक :— १८/०१/२०२१**

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u> :—**

**१) मा. कुलसचिव :— सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे— ०७**

**२) मा. विभागप्रमुख :— आपल्या विभागातील वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावे, ही विनंती.**

**३) मा. संचालक, सुरक्षा :— आपल्या माहितीत्सव व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.**